सकाळ | MITCON e-school Redefining IT Training | Jetking India's No. 1 Computer Hardware & Networking Institute SHIVAJINAGAR

आयोजित

# १०वी, १२वी, पदवीनंतर पुढे काय ?

**वक्त्या : डॉ. प्राची जावडेकर**
विषय : करिअरची जडण-घडण

**वक्ते : श्री. संजय गांधी**
विषय : IT करिअर

**वक्ते : प्रा. सुभाष शहाणे**
विषय : व्यावसायिक अभ्यासक्रम व स्पर्धा परीक्षेतून नोकरीच्या संधी

**वक्ते : प्रा. विजय नवले**
विषय : अभियांत्रिकी शिक्षणाचे मार्ग (डिग्री, डिप्लोमा, ITI)

**वक्ते : श्री. विजयराज खुळे**
विषय : आजची युवा पिढी

मिटकॉन इ-स्कूल तर्फे बीपीओ, कॉल सेंटर, ॲनिमेशन इत्यादी कोर्सेसची विनामूल्य कार्यशाळा, तसेच ज्यांना पुण्यामध्ये नोकरी करण्याची इच्छा असेल त्यांनी कार्यक्रमाच्या दिवशी बायोडेटा घेऊन यावा.
संपर्क : श्रीकांत - ९८५००७१२८३

जेटकिंग शिवाजी नगरतर्फे पुण्यामध्ये हार्डवेअर नेटवर्किंगचे ६ दिवसांचे विनामूल्य वर्कशॉप, तसेच खास मुलींसाठी फी मध्ये २५% शिष्यवृत्ती

**स्थळ : शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक, सोलापूर**
**रविवार, दि. १ जुलै ०७ वेळ : दुपारी ४ ते ७**
अधिक माहितीसाठी संपर्क :- नेहा ९८८१०९९०६२

**प्रवेश विनामूल्य. कार्यशाळेला येताना खालील कात्रण आणणे आवश्यक**

नाव : ______________________

फोन : __________ मोबाईल : __________

ई-मेल : ______________________

दै. सकाळ २८ जून २००७

# 'सकाळ'तर्फे आज करियर मार्गदर्शन कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

सोलापूर, ता. ३० : दहावी, बारावी, पदवीनंतरच्या संधीबाबत विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी 'सकाळ'च्या वतीने उद्या (ता. १ जुलै) सोलापुरात 'दहावी, बारावी, पदवीनंतर पुढे काय ?' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिंदे चौकातील शिवस्मारक सभागृहात दुपारी चार ते सायंकाळी सात या दरम्यान ही कार्यशाळा होईल.

दहावी-बारावीचा निकाल लागल्यानंतर पालक आणि विद्यार्थीही गोंधळलेल्या अवस्थेत असतात. नेमके पुढे काय करावे, असा प्रश्न असतो. अशा अवस्थेत योग्य मार्गदर्शनाची गरज असते; जेणेकरून विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्ज्वल घडू शकते. यासाठी 'सकाळ'ने या कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

या कार्यशाळेसाठी प्रवेश विनामूल्य आहे. या कार्यशाळेत डॉ. प्राची जावडेकर यांचे 'करियरची जडणघडण', संजय गांधी यांचे 'आय. टी. करियर', प्रा. विजय नवले यांचे 'अभियांत्रिकी शिक्षणाचे मार्ग' (डिग्री, डिप्लोमा) व विजयराज खुळे यांचे 'आजची युवा पिढी' या विषयांवर; तसेच प्रा. सुभाष शहाणे यांचे 'व्यावसायिक अभ्यासक्रम व स्पर्धा परीक्षेतून नोकरीच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन होईल.

याशिवाय कार्यशाळेचे खास आकर्षण म्हणजे 'मिटकॉन ई-स्कूल'तर्फे बीपीओ, कॉलसेंटर, ॲनिमेशन आदी अभ्यासक्रमांची विनामूल्य कार्यशाळा होणार आहे. ज्यांना पुण्यात नोकरी करण्याची इच्छा आहे, त्यांनी कार्यक्रमादिवशी आपला बायोडाटा व अर्ज घेऊन यावा. जेटकिंग, शिवाजीनगरतर्फे पुण्यात हार्डवेअर व नेटवर्किंगची सहा दिवसांची विनामूल्य कार्यशाळा होणार आहे.

यात खास मुलींसाठी शुल्कामध्ये २५ टक्के शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. 'सकाळ'ने या कार्यक्रमाचे आयोजन केले असून 'मिटकॉन ई-स्कूल' व 'जेटकिंग शिवाजीनगर' हे सहप्रायोजक आहेत. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी संपर्क : नेहा ९८८१०९९०६२ यांच्याशी संपर्क साधावा.

सकाळ

MITCON e-school Redefining IT Training

Jetking India's No. 1 Computer Hardware & Networking Institute SHIVAJINAGAR

१ जुलै २००७ सकाळ